महाराष्ट्र शासन

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांचे कार्यालय.

# परिपत्रक

क्रमांक. एफएलआर. ११२००९/२०५८८/सात. मुंबई, १८ फेब्रुवारी, २००९.

विषयः- एफएलबीआर-२ अनुज्ञप्ती मंजूर करताना लक्षात घ्यावयाच्या बाबी.

.............

मुंबई विदेशी मद्य नियमावली, १९५३ च्या नियम ४२-ए नुसार एफएल/बीआर-२ अनुज्ञप्ती मंजूर करण्याबाबत तरतूद आहे. सदर अनुज्ञप्ती मंजूर करण्याबाबत नियमातील तरतुदी व शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचना नुसार आवश्यक असलेल्या कागदपत्रांशिवाय आता सदर अनुज्ञप्ती मंजूर करण्यापूर्वी ग्रामसभेचा ठराव घेण्याबाबत शासनाने मा.मुख्यमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली दि. २४ नोव्हेंबर, २००८ रोजी झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आलेला आहे.

सबब उपरोक्त निर्णयानुसार वर नमूद केलेल्या अनुज्ञप्त्या मंजूर करण्यासाठी आवश्यक असलेल्या अर्जासोबत अर्जदाराने प्रस्तावित केलेली जागा ज्या ग्रामपंचायतीत आहे त्या ग्रामपंचायतीने ग्रामसभा घेवून नाहरकत दाखला देण्याचे बंधनकारक करण्यात येत आहे. प्रस्तावा सोबत ग्रामपंचायतीने मासिक सभेत ठराव करुन अशा ठरावाच्या आधारे ना हरकत प्रमाणपत्र सादर केले जाऊ शकतात. परंतु सदर अनुज्ञप्ती मंजूर करताना ग्रामसभेचा ठराव घेवून ना हरकत देणे बंधनकारक केले असल्याने प्रस्तावा सोबत मासिक बैठकीच्या ठरावा ऐवजी ग्रामसभेचा ठराव घेवून नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यात यावे. सदर अट यापुढे मंजूर करण्यात येणाऱ्या अनुज्ञप्त्यांसाठी लागू राहिल. मात्र नगरपरिषद, नगरपालिका व महानगरपालिका येथे वरील अनुज्ञप्त्या मंजूर करताना संबंधीत प्राधिकरणाच्या नाहरकत प्रमाणपत्राची आवश्यकता राहणार नाही.

अशा प्रकारचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर ग्रामसभेने दिलेले ना हरकत प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत पडताळणी करुन त्यानुसार वरील अनुज्ञप्त्या मंजूर करण्यात याव्यात. उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१) सर्व जिल्हाधिकारी.
२) सर्व विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
३) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.
४) या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी.
५) या कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी.
६) अभिलेखा शाखा ५ प्रती.
७) आयुक्तांचे स्वीय सहाय्यक २ प्रती.